541/1089
Wednesday,May 25 ,2016
3:48 PM

पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 1256 दिनांक: 25/05/2016

गावाचे नाव: एरजांड
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: उहन4-1089-2016
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: अत्री रिअल्टर्स भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री. दिपक जे. वेलानी

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 640.00
पृष्ठांची संख्या: 32	
एकूण:	रु. 30640.00

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 4:07 PM ह्या वेळेस मिळेल.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
Joint S.R. Ulhasnagar 4
उल्हासनगर-४.

बाजार मुल्य: रु.57114000 /-
मोबदला रु.57114000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 2285000/-

1) देयकाचा प्रकार: eSBTR/SimpleReceipt रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH001270239201617S दिनांक: 25/05/2016
बँकेचे नाव व पत्ता: IDBI
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 640/-

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
ई-सुरक्षित बँक व कोषागार पावती
e-SECURED BANK & TREASURY RECEIPT (e-SBTR)

14074516737560

Bank/Branch: IBKL - 6910717/Badlapur
Pmt Txn id : 90816112 Stationery No: 14074516737560
Pmt DtTime : 25-MAY-2016@12:57:23 Print DtTime : 25-May-2016@13:00:30
ChallanIdNo: 69103332016052550536 GRAS GRN : MH001270291201617S
District : 1201-THANE Office Name : IGR129-ULH2_ULHASNAGAR

StDuty Schm: 0030046401-75/STAMP DUTY
StDuty Amt : R 21,15,000/- (Rs Two One, One Five, Zero Zero Zero only)

RgnFee Schm: 0030063301-70/Registration Fees
RgnFee Amt : R 0/- (Rs Zero only)

उहन - ४
९०८ | २०१६
९ | ३२

Article : B25-Agreement to sell/Transfer/Assignment
Prop Mvblty: Immovable Consideration: R 5,71,14,000/-
Prop Descr : SURVEY NO 73,HISSA NO 4,,,ERANJAD,ERANJAD,THANE,Maharashtra,421503

Duty Payer: PAN-AFQPV6060E,DIPAK JAGDISHBHAI VELANI
Other Party: DLN--,TUKARAM KRISHNA MUSALE

Bank official1 Name & Signature

VAIBHAV DESHMUKH
सहायक प्रबंधक/Assistant
EIN - 124
EMP - 8305

Bank official2 Name & Signature

--- --- Space for customer/office use - - - Please write below this line --- ---

विकसन करारनामा

K.B. Musale

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ जि. ठाणे Dist-Thane

तुकाराम कृष्णा मुसळे

e-SBTR IS VALID UPTO SIX MONTHS FROM THE DATE OF PAYMENT.

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
ई-सुरक्षित बँक व कोषागार पावती
e-SECURED BANK & TREASURY RECEIPT (e-SBTR)

14074517120592

Bank/Branch: IBKL - 6910717/Badlapur
Pmt Txn id : 90816035
Pmt DtTime : 25-MAY-2016@12:56:46
ChallanIdNo: 69103332016052550534
District : 1201-THANE .

Stationery No: 14074517120592
Print DtTime : 25-May-2016@13:57:25
GRAS GRN : MH001270239201617S
Office Name : IGR129-ULH2_ULHASNAGAR

StDuty Schm: 0030046401-75/STAMP DUTY
StDuty Amt : R 1,70,000/- (Rs One, Seven Zero, Zero Zero Zero only)

RgnFee Schm: 0030063301-70/Registration Fees
RgnFee Amt : R 30,000/- (Rs Three Zero, Zero Zero Zero only)

Article : B25-Agreement to sell/Transfer/Assignment
Prop Mvblty: Immovable
Consideration: R 5,71,14,000/-
Prop Descr : SURVEY NO 73,HISSA NO 4,ERANJAD,,ERANJAD,ERANJAD,THANE,Maharashtra, 421503

Duty Payer: PAN-AFQPV6060E,DIPAK JAGDISHBHAI VELANI
Other Party: DLN--,TUKARAM KRISHNA MUSALE

उहन - ४	
१०८९	२०१६
२	३२

Bank Official1 Name & Signature

वैभव देशमुख
VAIBHAV DESHMUKH
सहाय्यक प्रबंधक/Assistant Manager
EIN - 124...
EMP - 8309...

Bank Official2 Name & Signature
--- --- Space for customer/office use - - - Please write below this line --- ---

विकसन करारनामा

K. B. Mesh

Vipal

लुकाराम कृष्णा मुसळे

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ यांची मुद्रा
जि. ठाणे
Dist-Thane

e-SBTR IS VALID UPTO SIX MONTHS FROM THE DATE OF PAYMENT.

.विकसन करारनामा.

सदरहु विकसन करारनामा हा आज दिनांक २५ माहे मे सन २०१६ रोजीचे दिवशी मौजे एरंजाड, ता-अंबरनाथ, जि-ठाणे, येथे तयार करण्यात आलेला आहे.

अत्री रिअल्टर्स भागीदारी संस्था तर्फे भागीदार)
१. श्री. दिपक जे. वेलानी, वयः- ३२ वर्षे,)
२. श्री. कैलास बबन म्हसकर, वयः- ४५ वर्षे,) विकसन करारनामा
कार्या. पत्ताः- बोंजर एव्हेन्यु, अंबरनाथ रोड,) लिहून घेणार
बेलवली, बदलापुर/पु, ताः-अंबरनाथ, जि-ठाणे.) प्रथम पक्षीय ....

हयांसी .....

श्री. तुकाराम कृष्णा मुसळे, वय :-४७ वर्षे,) **विकसन करारनामा लिहुन देणार**
रा- मौजे एरंजाड, ता-अंबरनाथ, जि- ठाणे) **व्दितीय पक्षीय .....**

उहन - ४
१०८९ | २०१६
3 | 32

कारणे करारनामा लिहून घेतात व देतात तो खालीलप्रमाणे :-

१. मौजेः-एरंजाड, ताः-अंबरनाथ, जि-ठाणे, येथील कुळगांव बदलापुर नगरपरीषद तसेच तलाठी सजा आंबेशिव व सहदुय्यम निबंधक उल्हासनगर-२ वा ४ यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत ही करारनामा लिहुन देणार यांच्या नावे सात बारा सदरी दाखल असुन सदरहु मिळकत ही पुर्वी श्री. कृष्णा रामा मुसळे यांचे नांवे सात बारा सदरी दाखल होती. व ते दिनांक ०३/०३/२०१० रोजी मयत झाल्यानंतर सदरहु मिळकत ही त्यांचे कायदेशिर वारस म्हणजेच श्रीमती. लक्ष्मीबाई कृष्णा मुसळे व ईतर ६ यांचे नांवे गांव दप्तरी फेरफार क्रमांक १११८ अन्वये दाखल करण्यात आली.

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ यांची मुद्रा
जि. ठाणे Dist-Thane

तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. Mhatre

तदनंतर सदरहु सात बारावरील श्रीमती. लक्ष्मीबाई कृष्णा मुसळे व ईतर ५ यांनी त्यांचा सदरहु मिळकतीमधील हक्क हा त्यांचा भाउ श्री. तुकाराम कृष्णा मुसळे म्हणजेच करारनामा लिहुन देणार यांचे लाभार्थ **रजिस्टर्ड हक्कसोडपत्र क्रमांक १०२२/२०१२, दिनांक २५/०१/२०१२** अन्वये सोडुन दिला. व सदरहु मिळकतीमधील त्यांचा हक्क व अधिकार हा **फेरफार क्रमांक १२७३** अन्वये कमी करण्यात आला व सदरहु मिळकत ही आज रोजी विकसन करारनामा लिहुन देणार यांचे नांवे सात बारा सदरी दाखल आहे. व सदरहु मिळकत ही श्री. तुकाराम कृष्णा मुसळे यांनी विकसन करारनामा लिहुन घेणार यांस विकसनासाठी देण्याचे ठरविलेले आहे, ती मिळकत खालीलप्रमाणे :-

गावाचे नांव	सर्व्हे/हिस्सा क.	क्षेत्र हे. आर. प्रति	आकार रू. पैसे
मौजे:-एरंजाड, ता:-अंबरनाथ, जि-ठाणे.	७३/४,	०-४४-३ पोट ख. ०-०३-८ एकुण क्षेत्र ०-४८-१	२.३१ पैसे

उ ह व - ४

१०८९	२०१६
४	३२

सदरहु मिळकतीच्या चतुर्सिमा खालीलप्रमाणे :- सर्व्हे क्रमांक ७३/४

पुर्वेस :- सर्व्हे क्रमांक १२२ ची मिळकत.

पश्चिमेस :- सर्व्हे क्रमांक ७३/३ ची मिळकत व १५ मीटर डी.पी. रोड.

दक्षिणेस :- सर्व्हे क्रमांक ११९ चा हिस्सा.

उत्तरेस :- सर्व्हे क्रमांक ७२ ची मिळकत.

Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ जि. ठाणे Dist. Thane

अ. येणेप्रमाणे चर्तुसिमा पुर्वक चोख बोजाविरहीत निर्वेध व खुदद ताबे कब्जा वहिवाटीची मिळकत ही लिहुन देणार यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. व सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांच्याच प्रत्यक्ष ताबे व कब्जेवहीवाटीत आहे व तेच सदरहु मिळकतीचे मालकी हक्काने उत्पन्न व उपभोग घेत आहेत.

× तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. Moder

ब. आणि ज्याअर्थी द्वितीय पक्षीय यांना सदर वरील मिळकतीमध्ये आर. सी. सी. स्वरूपाची बिल्डींग बांधुन विकसित करण्याची इच्छा आहे. परंतु आपल्या आर्थीक अडचणींमुळे द्वितीय पक्षीय हे सदरहू मिळकत विकसीत करू शकत नाहीत. सबब त्यासाठी ते सदर मिळकत विकसनासाठी देवून तेथे आर. सी. सी. स्वरूपाची बिल्डींग बांधून देणा-या योग्य व्यक्तीच्या/विकासकाच्या शोधात होते.

क. द्वितीय पक्षीय योग्य त्या बिल्डर्सच्या शोधात आहेत असे कळल्यावरून प्रथम पक्षीय यांनी व्दितीय पक्षीय यांच्याशी संपर्क साधला आणि प्रथम पक्षीय यांनी मिळकतीची पाहणी करून सदर मिळकतीची कागदपत्रे पाहून सदर मिळकत विकास कामासाठी योग्य आहें अशी खात्री करून घेवून द्वितीय पक्षीय यांचे जवळ सदर मिळकत विकासकामासाठी अधिकार देणेबाबत प्रस्ताव मांडला व व्दितीय पक्षीय यांस सुद्धा सदरहू मिळकत विकसीत करणे शक्य होत नसल्याकारणाने विकसीत करण्याच्या उद्देशाने उभय पक्षी सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती दुसरे पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांस खालील अटी व शर्तीवर सदर मिळकत विकसीत करण्यास देण्याचे मान्य केले.

उ.स.नं. ४	
१०८९	२०१६
५	३२

ड. तदनंतर उभय पक्षीयांत सदरहु मिळकतीच्या विकासाच्या कराराच्या व्यवहाराबददल दोन तीन बैठका झाल्या. बैठकींतुन सदरहु मिळकतीचा व्यवहार उभय पक्षीयांनी निश्चीत केला. त्यावेळी उभय पक्षीयांनी सदरहु मिळकतीच्या विकसनाबाबतच्या अटी व शर्थी निश्चीत केल्या त्या येणेप्रमाणेः-

१. सदरहु मिळकतीचे विकसन हक्क लिहुन घेणार यांना देण्याच्या मोबदल्यात लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना वास्तु स्वरूपी मोबदल्याच्या अंतर्गत सदरहु वरील संपुर्ण मिळकतीवर कुळगांव बदलापुर नगर परीषद यांच्याकडुन मंजुर होणा-या एकुण बांधकामापैकी **३२ टक्के** सेलेबल म्हणजेच **१७,२००/- चौरस**

K. B. Mayer

तुकाराम कृष्णा मुसळे

फुट कारपेट या क्षेत्राच्या निवासी सदनिका या व्दितीय पक्षीय यांस देण्याचे ठरलेले आहे. व सदरहु सदनिका या प्रथम पक्षीय हे व्दितीय पक्षीय यांस प्रत्येक मजल्यावर समान प्रमाणात अदा करतील व सदरहु सदनिकांचे स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी, सर्व्हीस टॅक्स, वॅट टॅक्स, ईतर विकसन चार्जेस हे चालु बाजारभावाप्रमाणे द्वितीय पक्षीय यांनी वा त्यांनी विकलेल्या सदनिकाधारकांनी प्रथम पक्षीय यांस अदा करावयाचे आहेत.

२. तसेच सदरहु इमारतींचे बांधकाम हे प्रथम पक्षीय यांनी सदरहु विकसन करारनामा नोंदणीकृत झाल्यापासुन ६० महीन्याच्या कालावधीत पुर्ण करावयाचे आहे वा तसे न झाल्यास प्रथम पक्षीय हे व्दितीय पक्षीय यांस प्रत्येक महीन्याचा व्याज म्हणुन रक्कम रू. ५०,०००/- अक्षरी पन्नास हजार मात्र ही रक्कम व्याज म्हणुन अदा करतील.

३ हजार - ४	
१०८९	२०१६
६	३२

३. तसेच सदरहु विकसन करारनामा नोंदणीकृत झाल्यानंतर व्दितीय पक्षीयांनी सदरहु मिळकतीची सरकारी मोजणी करून घ्यावयाची आहे व सदरहु मोजणी करतेवेळी जर का सात बारावरील क्षेत्रापेक्षा क्षेत्र कमी भरले तर कमी भरलेल्या क्षेत्राचा मोबदला हा प्रथम पक्षीय हे व्दितीय पक्षीय यांस देणा-या बांधकाम रूपी मोबदल्यातुन वजा करावयाचा आहे.

४. तसेच सदरहु विकसन कराराचा मोबदला म्हणुन **रक्कम रूपये ७०,००,०००/- अक्षरी रक्कम रू. सत्तर लाख मात्र** ही रक्कम मोबदला म्हणुन व्दितीय पक्षीय यांस देण्याचे प्रथम पक्षीय यांनी मान्य व कबुल केलेले आहे. व सदरची मोबदला रक्कम ही लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना चेक स्वरूपात खालीलप्रमाणे अदा केलेले आहेत.

तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. [illegible]

बँकेचे नांव	चेक क्रमांक	दिनांक	रक्कम
Ambernath Jai Hind co. op Bank	076417	14/3/2016	4,00,000/- K
" "	076424	26/4/2016	5,00,000/- K
Ratnakar Bank	104841	26/4/2016	2,00,000/-
The T.D.C co. op Bank Ltd.	066254	26/4/2016	3,00,000/-
Ambarnath Jai Hind co. op Bank.	076421	15/6/2016	8,00,000/- K
The T.D.C co. op Bank Ltd.	063215	15/6/2016	4,00,000/-
" "	066251	15/6/2016	4,00,000/-
Ambarnath Jai Hind Co. op Bank	076422	20/8/2016	8,00,000/- K
The T.D.C co. op Bank Ltd.	063216	20/8/2016	3,00,000/-
" "	066252	20/8/2016	3,00,000/-
Bank of india	000048	20/8/2016	4,00,000/-
" "	000046	20/10/2016	4,00,000/-
Ambarnath Jai Hind co. op Bank	076423	20/10/2016	8,00,000/- K
Ratnakar Bank	104840	20/10/2016	10,00,000/-
—	—	—	
—	—	—	

उहन - ४
१०८९ | २०१६
6 | 32

५. उभय पक्षीयांचे दरम्यान सदरहु मिळकतीची उपरोक्त ठरलेली किंमत तथा मोबदला हा प्रचलीत बाजारभावाप्रमाणे वाजवी व योग्य आहे. करारनामा लिहुन घेणार यांनी कळगांव बदलापुर नगर परीषदेकडुन सदरहु मिळकतीचा झोन दाखला नगरपरीषद क्षेत्रासाठी मंजुर झालेल्या विकास आराखडयाप्रमाणे काही क्षेत्र हे डी. पी. रस्त्याने बाधीत झालेले आहे. सबब सदरहु क्षेत्राचा जो एफ.एस.आय. प्राप्त होणार आहे, तो विकासक यांनी सदरहु मिळकतीवर वापरावयाचा आहे वा अन्य कोणत्याही दुस-या मिळकतीवर हस्तांतरीत करावयाचा आहे.

K.B. [signature]

सुकाराम कृष्णा मुरळे

६. विकसन करारनामा लिहुन देणार व लिहुन घेणार यांमध्ये असे ठरलेले आहे की, सदरहु मिळकतीवर तसेच त्या मिळकतीच्या लगत असलेल्या मिळकतींवर बांधल्या जाणा-या ईमारतींसाठी कुळगांव बदलापुर नगर परीषद/एम.एम.आर.डीए यांसकडुन विकसन करारनामा नोंदणीकृत झाल्यापासुन प्लॅन पास करून घ्यावयाचा आहे व सदरहु मिळकत ही बिनशेती करण्याकामी प्रथम पक्षीय यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडे अर्ज करावयाचा आहे.

तसेच सदरहु विकसनासाठी घेतलेल्या मिळकतीलगत असणा-या मिळकती या एकत्र करून सुद्धा प्रथम पक्षीय हे सदरहु मिळकत विकसीत करू शकतात व त्यांस व्दितीय पक्षीय यांची कोणत्याही प्रकारची हरकत असणार नाही.

७. लिहुन घेणार यांनी स्वखर्चाने सदरहु मिळकतीचा वापर बिनशेती प्रयोजनासाठी करून घ्यावयाचा आहे. तसेच लिहुन घेणार यांनी सदरहु मिळकतीचा बांधकाम आराखडा हा कुळगांव बदलापुर नगर परीषद यांसकडुन स्वखर्चाने मंजुर करून घ्यावयाचा आहे. परंतु प्रथम पक्षीय यांनी वापरलेला टीडीआर व विकत घेतलेला प्रिमियम एफ.एस.आय यामध्ये व्दितीय पक्षीय यांचा कोणताही हक्क व हितसंबंध असणार नाही. तसेच सदरहु मिळकतीतुन निर्माण होणार टी.डी.आर. हा प्रथम पक्षीय हे अन्य कोणत्याही तृतीय पक्षीय यांस सुद्धा विकु शकतात व त्यांस व्दितीय पक्षीय यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

उहन - ४	
१०८९	२०१६
८	३२

८. सदरहु मिळकतीचा चेक स्वरूपाच्या मोबदल्याचा/सदनिकांचा भरणा वरील लिहुन घेणार यांचेकडुन लिहुन देणार यांना पुर्णपणे मिळाल्यावर सदरहु मिळकतीचे अंतिम खरेदीखत लिहुन घेणार सांगतील त्यावेळी सदरहु मिळकतीमधील नियोजीत इमारतींमधील सदनिका धारकांचे सोसायटीचे नांवे करून ते नोंदवुन देण्यास लिहुन देणार तयार असुन लिहुन घेणार यांना कबुल व बांधील आहेत.

तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. Mane

९. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकत ही लिहुन देणा-यांची मालकी हक्काची असुन सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांच्या प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची आहे. तसेच सदरहु मिळकतीचे टायटल हे चोख व निर्वीवाद व स्वच्छ आहे. तसेच सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांच्या मालकी हक्काची व कब्जावहीवाटीची असल्याने अन्य कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क सत्ता संबंध नाही. अशी ही सदरहु मिळकतीची विकसीत करणे व विल्हेवाट लावण्याचा पुर्ण अधिकार लिहुन देणार यांना आहे. सदरहु मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा बोजा नाही अशी ही बोजाविरहीत निर्वीवाद सदरहु मिळकत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना विकसीत करण्यासाठी देण्यास या करारनाम्याने कबुल केले आहे. परंतु सदरहु मिळकत ही विकसीत करत असताना जर का कोणताही कायदेशीर अडथळा आला वा हरकत आली तर सदरहु हरकतीचे निवारण हे द्वितीय पक्षीय यांनी त्यांच्या खर्चाने करावयाचे आहे. व सदरहु हरकतीमुळे जो कालावधी वाढणार आहे तेवढा अवधी प्रथम पक्षीय यांस बांधकामासाठी दिलेल्या मुदतीमध्ये सुद्धा वाढवुन द्यावयाचा आहे.

उ ह न - ४	
१०८९	२०१६
९	३२

१०. परंतु जर का काही कारणांमुळे सदरहु मिळकत ही कोणत्याही कारणांसाठी आरक्षित करण्यात आली, वा सदरहु मिळकतीवर ईमारतीचे बांधकाम करणे हे सरकारी नियमांमुळे शक्य झाले नाही, तर सदरहु विकसन करारनामा हा रद्यबातल करण्यात येईल. व द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांसकडुन घेतलेली मोबदला रक्कम ही त्यांस परत करण्यात येईल.

११. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकतीचा मालकी हक्क व कब्जावहीवाट ही लिहुन देणार यांची असुन लिहुन देणार यांनी सदरहु मिळकतीच्या बाबतीत वा तीच्या कोणत्याही स्वरूपाचा कोणाही व्यक्तीशी लेखी वा

तुकाराम कृष्णा मुसळे

K. B. Mosley

तोंडी करार केलेला नाही. किंवा सदरहु मिळकत वा तिचा कोणताही भाग अन्य कोणासही भाडयाने दिलेली नाही की गहाण, दान, तारण वा वहीवाटीने दिलेली नाही, तसेच सदरहु मिळकतीवर वा तीचे कोणत्याही भागावर बोजा नाही. वा तसे आढळुन आल्यास त्याचे निवारण करून देणेस लिहुन देणार तयार असुन लिहुन घेणारांना बांधील आहेत. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकतीसंबंधी वा तिच्या कोणत्याही संदर्भात लिहुन देणार यांना आजपावेतो राज्यशासन, निमसरकारी वा सरकारी संस्था यांजकडुन कोणत्याही स्वरूपाची सुचना, हुकुम वा नोटीस मिळालेली नाही. तसेच सदरहु मिळकत ही कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाने बाधीत नाही.

उहन - ४

१०८९	२०१६
१०	३२

१२. सदरहु मिळकत विकसीत करणेकामी लिहुन घेणार यांनी सर्वे क्रमांक **७३/४** या मिळकतीस लगत असलेली मिळकत एकत्र करून विकसनासाठी सोयीचा असा नियोजीत इमारतीचा आराखडा हा कुळगांव बदलापुर नगर परीषदेकडुन मंजुर करून घेण्याचा असुन अश्या रीतसर परवानगी लिहुन घेणार यांनी स्वखर्चाने घ्यावयाच्या आहेत. त्याकामी गरज भासल्यास सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतींच्या मंजुर आराखडयामध्ये दुरूस्ती करून बांधकाम परवानगी तसेच सदरहु कामी ज्या काही परवानग्या आवश्यक असतील त्या सर्व परवानग्या लेखी जाबजबाब लागतील ते सर्व काही लिहुन घेणार यांनी आणुन घेण्याचे कबुल केले असुन ते आणताना लिहुन देणार हे सर्व प्रकारचे सहकार्य करतील. अगर लिहुन घेणारांनी लिहुन देणार यांचे कुलमुखत्यारी म्हणुन करण्याची आहेत. त्यासाठी आवश्यक असे ईर-रीव्होकेबल जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी हया करारनामाचा पुरक दस्त म्हणुन लिहुन देणार देत आहेत. मात्र त्याकामी होणारा सर्व खर्च हा लिहुन घेणारांनी करावयाचा आहे.

Sub Registrar Class II, Ulhasnagar No. 3 ... Dist. Thane

जि. ठाणे

उमाराम कलाजी सुतार

K.B. Mane

१३. सदरहु मिळकतीचे अंतिम खरेदीखत वा खरेदीखते हे सदरहु मिळकतीवरील इमारतीमधील फलॅटधारकांच्या सोसायटी व सोसायटयांचे नांवे सदरहु करारानुसार सदरहु मिळकतीवर पुढे बांधावयाच्या नियोजीत ईमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर वास्तुपुर्णतेचा दाखला मिळाल्यावर करावयाचे आहे.

१४. सदरहु विकसन करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या मुदतीत सदरहु मिळकतीचे सोसायटीच्या नांवे खरेदीखत करून देणेकामी लिहुन देणार यांनी टाळाटाळ केल्यास वा लिहुन घेणारांनी टाळाटाळ केल्यास उभय पक्षीयांना सदरहु कराराची पुर्तता करून मागण्याचा पुर्ण कायदेशीर अधिकार आहे व राहील.

१५. सदरहु मिळकतीचा खास खुला कब्जा लिहुन देणारांनी लिहुन घेणारांना आज रोजी सदरहु विकसन करारनाम्याचे वेळी लिहुन दिलेला आहे. सदरहु मिळकतींच्या चर्तुसिमा समजावुन, खाणाखुणा दाखवुन दिलेल्या आहेत. व त्याप्रमाणे तो मिळालेला असल्याचे लिहुन घेणार कबुल करीत आहेत.

उ ह न - ४	
१०८९	२०१६
११	३२

१६. सदरहु करारनामा लिहुन घेणारांनी सदरहु मिळकतीचा नियोजीत इमारतीचा आराखडा तयार करून घेणे झाल्यास तसा तयार करून खास खुला कब्जा लिहुन देणारांनी लिहुन घेणारांना आज रोजी सदरहु करारनाम्याचे वेळी दिलेला आहे. सदरहु मिळकतीचा आराखडा व बांधकाम परवानगी मिळवुन मगच सदरहु इमारतीच्या इमारत आराखडयावर हुकुम घेवुन मगच लिहुन घेणारांनी बांधकाम सुरू करावे. त्यासाठी स्वतःच्या पदरखर्चाने समक्ष वास्तुशिल्पकार नियुक्त करून इमारतीचा आराखडा तयार करून घ्यावा, त्याची संबंधीत खात्याकडुन मंजुरी मिळविणे तसेच तदनंतर सदरहु मिळकतीवर बांधण्यात यावयाच्या इमारतीचा इमारत आराखडा तसेच बांधकाम करण्यासाठी आवश्यक अशी बांधकाम परवानगी मिळविणे, मगच बांधकाम सुरू करावे. ही सर्व कामे करताना वा वरील परवानग्या

तुकाराम कृष्णा मुसळे

K. B. [illegible]

संबधीत खात्यांकडुन मिळवितांना सदरहु खात्यामध्ये लिहुन देणारांचे वतीने कामे करणे, कागदपत्र पुरविणे, जाबजबाब देणे, साक्षी पुरावे देणे, तेथे लिहुन देणारांचे प्रतिनिधित्व करणे, आदी सर्व कामे कृत्ये दस्त, ही लिहुन देणारांचे प्रतिनीधी म्हणुन लिहुन घेणार यांनी करावयाची आहेत. त्यासाठी स्वतंत्र असा कुलमुखत्यारपत्र लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना देत आहेत. मात्र सदरहु मिळकतीवर इमारतीचे कामे बांधकाम ही लिहुन घेणारांनी विधिवत करावयाची आहेत.

१७. सदरहु मिळकतीवर प्रोजेक्ट लोन घेण्याबाबतचा खास अधिकार लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना याव्दारे येथे देत आहेत. मात्र लिहुन घेणार यांनी सदरहु मिळकतीवर घेतलेल्या प्रोजेक्ट लोनला लिहुन घेणारच जबाबदार आहेत व राहतील. त्याची कोणत्याही प्रकारची तोषीस लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना लागु देण्याची नाही अशी स्पष्ट हमी लिहुन घेणार येथे लिहुन देणार यांना देत आहोत.

उ.ह.न. ४	
१०८९	२०१६
१२	३२

१८. सदरहु मिळकतीचे विकासाचे कामे लिहुन घेणार करणार असुन पुढे त्यावर इमारत बांधुन फलॅटस / वाणीज्य गाळयांची विक्री करणार असल्यामुळे विकसन करारनामा लिहुन घेणार यांना विकसन करारनामा लिहुन देणार हे खालील खास व सर्व अधिकार देत असुन तसे स्वतंत्र कुलमुखत्यारपत्र देत आहेत.

अ. लिहुन घेणारांचे नावी सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतीमधील फलॅटस / गाळे विक्रींचे साठेखत वा खरेदीखते करतील. त्या त्या इसमांना वा संस्थेस अंतिम फरोक्तखत वा खते करून देताना संमतीची गरज लागल्यास ती देणे, तसेच विक्रीची किंमती स्विकारणे, पावत्या घेणे व त्यासंबंधी तसेच व्यवहारासंबंधी ज्या ज्या सरकारी कार्यालयात कामकाज असेल त्या त्या कामाकरीता जाबजबाब

तुकाराम कृष्णा मुसळे

K. B. Mistar

देणे, कागदपत्र पुरविणे, स्विकारणे, जाबजबाबावर अर्जावर सहया करणे, त्या प्रित्यर्थ खर्च करणे.

ब. सदरहु मिळकतीचा इमारत आराखडा तयार करताना सदरहु मिळकत ही लगतच्या मिळकतीमध्ये अमलगमेट करणे तसेच तिच्यावर अन्य इमारतीचा टी.डी. आर. वापरणे ई. सर्व अधिकार वापरून त्यावर बांधण्यात येणा-या इमारतीचा आराखडा मंजुरीस सादर करणे, तसेच बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव नगर पालिकेचे नगररचना खात्याकडे मंजुरीसाठी सादर करणे, अर्ज करणे, त्यांना लागणारी कागदपत्रे पुरविणे, जाबजबाब देणे, संमतीपत्र देणे व जरूर त्या कागदपत्रावर सहया करणे, रक्कमा भरणे, रक्कमा स्विकारणे, पावत्या देणे, घेणे तसेच मंजुर आराखडयात काही दुरूस्त्या करावयाच्या असल्यास त्या संबंधीत खात्याकडुन करून घेणे तसेच नव्याने प्लॅन तयार करताना शक्य होईल तितका सोईचा होणेसाठी लगतच्या मिळकतीस तो जोडणे व एकसंघ वा विभागुन असा प्लॅन मंजुरीस समक्ष नगर रचना अधिका-यांकडे देताना लागणारे अर्ज करणे, जाबजबाब देणे तशी संमती देणे त्याकामी सत्यप्रतिज्ञालेख देणे, संमतीपत्र देणे इत्यादी कामाकरीता स्थापत्यकार, वास्तुशिल्पकार नियुक्त करणे, गरज भासल्यास वकील तथा अधिवक्ता नियुक्त करणे, त्याकामी होणारा सर्व खर्च करणे, त्यांची बिले अदा करणे, पावत्या देणे, घेणे, नियुक्त केलेल्या वरील लोकांची वरील लोकांची फी देणे पावत्या घेणे.

उ ह म - ४

१०८९	२०१६
१३	३२

क. सदरहु मिळकतीवरील नियोजीत बांधकामाचा मंजुर प्लॅन बांधकाम परवागनी प्रमाणे व दुरूस्त प्लॅन मिळाल्यावर बांधकाम सुरू करणे, पाया खोदणे, अन्य आवश्यक असे खोदकाम करणेसाठी आवश्यक ती पाउले उचलुन तो तयार करून घेणे तसेच सदरहु मिळकतीवर खोदकाम करणेसाठी मशिनरी, मजुर, मटेरीयल आणण्याची फलक लावण्याची परवानगी व मुभा लिहुन देणारांनी येथे दिलेली

तुकाराम [illegible] मुसळे

K.B. Master

आहे. इमारतीमधील फलॅटसची बुकींग करणे, गि-हाईक शोधणे, त्यांचेबरोबर करार करणे, विक्री किंमतीचा भरणा, विक्री किंमती घेणे वसुल करणे, गरज भासल्यास नोटीसा देणे, उत्तरे आदी तदुनषंगीक कामे करणे, याबाबतचे सर्व अधिकार हे लिहुन देणार हे येथे देत आहेत.

ड. सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतीवरील फलॅटस, बॉक्सचे, शॉप्सचे, विक्री संबंधाने लिहुन घेणार ज्या कोणा गि-हाईकांना विक्री करतील ते त्यांना पुर्णपणे तबदील होण्यासाठी करावयाच्या कायम फरोक्तखत करतील त्यांस लिहुन देणारांनी मालक या नात्याने लागणारी संमती देणे वा कायम फरोक्तखत त्या त्या व्यक्ती वा संस्थांचे नांवे करणे, सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतीमधील फलॅटस, ब्लॉक्स, गाळे धारकांचे नांवे केलेल्या कायम फरोक्तखतानंतर गावच्या तसेच सरकार दप्तरी त्यांचे नांवे करताना लागणारी नोटीसा, अर्ज, जाबजबाब, सत्यप्रतिज्ञालेख, हमीपत्र आदी देणे.

उहन - ४	
१८९	२०१६
९६	३२

ई. सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतीचे कामी आवश्यक तो विज पुरवठा, पाणी पुरवठा, मिळविण्यासाठी संबंधीत खात्याकडे अर्ज करणे, कागदपत्र देणे, त्यावर सहया करणे, तेथील फीसंबंधीत रक्कमा भरणे, पावत्या घेणे मात्र त्याचा होणारा खर्च लिहुन घेणारांनी करणे. सोसायटी स्थापत्य करणे तिची नोंदणी करून घेणे.

फ. सदरहु मिळकतीवरील नियोजीत इमारतीमधील सर्व फलॅट धारकांची हौसींग सोसायटी स्थापन करणे, त्याकामी नोंदणी कार्यालयांत लिहुन देणारांचे प्रतिनिधीत्व करणे आणि सोसायटी नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून तसा सोसायटी दाखला मिळविणे ईत्यादी कामे करणे.

तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. Mistry

१९. सदर आर. सी. सी. बिल्डींगच्या विकासाचे काम करतांना इतर नागरिकांना त्यांच्या सर्वसामान्य व्यवहारात काही त्रास व अडचण होणार नाही याची खबरदारी प्रथम पक्षीय यांचेवर राहील व त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या कामगारांच्या निष्काळजीपणाने काही नुकसान झाल्यास त्या नुकसानीस प्रथम पक्षीय जबाबदार राहतील. तसेच सदर मिळकतीवर यंत्र सामुग्री ठेवणे बांधकाम साहित्य ठेवणे, मजुर तज्ञ व्यवसायिक बोलावणे, गुरखा रखवालदार ठेवणें यांचे सर्व अधिकार प्रथम पक्षीय यांस द्वितीय पक्षीय यांनी दिलेले आहेत.

२०. सदर मिळकतीबाबतचा सदर विकास करार योग्य ती स्टॅम्प डुयटी लावुन योग्य त्या कार्यालयात प्रथम पक्षीय यांनी त्यांचेच खर्चाने नोंदविण्याचा आहे मात्र त्यासाठी लागणा-या आवश्यक त्या सहया द्वितीय पक्षीय यांनी वेळोवेळी दयावयाच्या आहेत.

उ ह न - ४	
१०८९	२०१६
१५	३२

२१. द्वितीय पक्षीय मान्य करीत आहेत की, सदर मिळकतीचे संबंधात अतीरीक्त बांधकामासाठी एफएसआय / टीडीआर विकत घेणे अथवा विक्री करणे, ईतरत्र वापरणे इत्यादींचा सर्व अधिकार प्रथम पक्षीय यांना राहील व त्यामध्ये द्वितीय पक्षीय वा त्यांचे वालीवारस हे हस्तक्षेप करणार नाहीत.

२२. सदर मिळकतीचे विकास कामासाठी लागणारे बांधकाम साहित्य, कामगार, यंत्रसामुग्री यांचा सर्व खर्च व सर्व आर्थिक गरजा प्रथम पक्षीय यांनी भागविणेच्या आहेत. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम न करता मंजुर आराखडयाप्रमाणे प्रथम पक्षीय यांनी बांधकाम करणेचे आहे. तसे प्रथम पक्षीय यांनी मान्य केले आहे.

तुकाराम कृष्णा मुरुळे

K.B. Mosur

२३. द्वितीय पक्षीय मान्य करीत आहेत की, सदर विकसन कराराअन्वये प्रथम पक्षीय यांस मिळालेले हक्क हे प्रथम पक्षीय हे अन्य कोणत्याही तृतीय पक्षीय यांस हस्तांतरीत/तबदील करण्याचे अधिकार हे प्रथम पक्षीय यांस आहेत. व त्यासाठी द्वितीय पक्षीय यांची वेगळी संमती घेण्याची आवश्यकता नाही. परंतु प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीय यांजबरोबर ठरविलेला मोबदला हा कायम राहील व सदरहु मोबदला हा द्वितीय पक्षीय यांस देण्याची जबाबदारी मात्र प्रथम पक्षीय यांचीच राहील तसेच सदरहु विकसनासाठी दिलेल्या मिळकतीमधुन अन्य मिळकतींना रस्ता उपलब्ध करून देण्याचा सुद्धा अधिकार हा सदरहु विकसन कराराअन्वये द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांस दिलेला आहे.

२४. सदर मिळकतीचे एकुण क्षेत्र निश्चित करण्याच्या दृष्टीने तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबरनाथ यांजकडुन वा अधिक्षक, भूमी अभिलेख, ठाणे, यांजकडुन मोजणी करून घेण्याची जबाबदारी ही प्रथम पक्षीयांकडे राहील आणि त्याच्या दिशा व हददी पक्क्या करण्याची जबाबदारी देखील द्वितीय पक्षीयांकडे राहील. परंतु त्यासाठी येणा-या खर्चाची जबाबदारी प्रथम पक्षाची राहील.

उ ह न - ४	
१०८९	२०१६
१६	३२

२५. सदरहु करारनामा हा उभयपक्षीयांनी मुक्त संमतीने केलेला असुन तो उभयपक्षीयांवर व त्यांच्या वालीवारसावर तसेच त्यांचे कुलमुखत्यारपत्र धारक व त्यांचेतर्फे हक्क सांगणा-यांवर पुर्णपणे बंधनकारक आहे व राहील, याची साक्ष म्हणुन उभय पक्षीयांनी पुर्णपणे शुद्धीवर असताना व स्वसंतोषाने पुर्णपणे जाणीव पुर्वक खालील साक्षीदारांसमक्ष सदरहु विकसन करारावर आज दिनांक २५ माहे मे सन २०१६ रोजी सहया केल्या आहेत.

तुकाराम कृष्णा मुसळे

K.B. [illegible]

नांव	सही/अंगठा	फोटो
अत्री रिअल्टर्स भागीदारी संस्था तर्फे भागीदार १. श्री. दिपक जे. वेलानी, २. श्री. कैलास बबन म्हसकर, (विकसन करारनामा लिहून घेणार)		 

नांव	सही/अंगठा	फोटो.
श्री. तुकाराम कृष्णा मुसळे, (विकसन करारनामा लिहून देणार)	तुकाराम कृष्णा मुसळे	

उहन - ४	
१०८९	२०१६
१७	३२

साक्षीदार :-

१. श्री. रमेश हरी मेहेर.
रा. एरंजाड, ता-अंबरनाथ, जिल्हा ठाणे.

रमेश हरी मेहेर

२. श्री. उपेक्षा गुरुनाथ शेलके.
रा. शिरवांव, बदलापूर पु, ता-अंबरनाथ.

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ यांची मुद्रा जि. ठाणे Dist-Thane

गांव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक)

गांव : [illegible]

तालुका : अंबरनाथ

जिल्हा : ठाणे

भूमापन क्रमांक	भूमापन क्र. उपविभाग	भूधारण पध्दती
७३	४	२

शेतीचे स्थानिक नांव- निसर्ग कु क्र ४३

लागवडीयोग्य क्षेत्र	हेक्टर	आर	पैसे
....	0	88	3
एकूण	0	88	3
पाटखराब (लागवडी योग्या नसलेले) वर्ग (अ) वर्ग (ब)	0	03	5
एकूण	0	03	5
आकारणी	रुपये	पैसे	
जुडी किंवा विशेष आकारणी	2	39	
	2	39	

भोगवटदाराचे नांव

४५८ ४८८ ७७० ५३४

तुकाराम कृष्णा मुसले

१२७३ १११८

५४०

खाते क्रमांक :

कुळाचे नांव :

इतर अधिकार :

४५८ ८०९

सिमा आणि भूमापन चिन्हे

उ ह न - ४	
१०८९	२०१६
१८	३२

गांव नमुना बारा (पिकांची नोंदवही)

वर्ष	हंगाम	पिकाखालीक क्षेत्राचा तपशिल: निश्चित पिकाखालील क्षेत्राचे: निश्चित पिकाचा संकेत क्रमांक	जल सिंचित	अजल सिंचित	घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र: पिकाचे नांव	जल सिंचित	अजल सिंचित	निर्भेळ पिकाखालील क्षेत्र: पिकाचे नांव	जल सिंचित	अजल सिंचित	लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमिन: स्वरूप	क्षेत्र	जलसिंचनाचे साधन	जमिन कारणाऱ्याचे नांव	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
२०१५/१६								ह भा०	०४४-३						

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ यांची मुद्रा जि. ठाणे Dist-Thane

अस्सल वर हुकूम खरी नक्कल दिली असे, तारीख : १/३/१६

तलाठी

तलाठी सजा, [illegible]

[illegible] अंबरनाथ, जि. ठाणे

फेरफारची नोंदवही (हस्तलिखित पध्दत)

तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे

अ.क्र.	तारीख	फेरफाराचा प्रकार	गावाचे नाव	भूमापन क्रमांक / पोटहिस्सा क्रमांक	क्षेत्र	आकार	इतर हक्क	शेरा
१७१८	३१/३/२०१०	वारसाने	अंबरनाथ	४५/२				
				१२३१/क				
				१५/१०अ				
				१४/१३				
				५३/४				
				११९				

तारीख २७/३/२०१० वारसाने वरून वारसाने फेरफार केलेल्या सर्वे नंबरच्या जमिनीचे खातेदार कृष्णा रामा मुसळे हे दिनांक ३१/३/२०१० रोजी मयत झाले असून त्यांस तारस खालील प्रमाणे

अ.क्र. नाव नाते काय

१) लक्ष्मीबाई कृष्णा मुसळे पत्नी ८५
२) मारामती कृष्णा मुसळे पत्नी ८२
३) तुकाराम कृष्णा मुसळे मुलगा ४०
४) मंजूळा मारुती पाटील मुलगी ५०
५) राधुताई रामचंद्र घाडगे मुलगी ४५
६) मंदा दत्तात्रय भलेकर मुलगी ४४
७) रंजना भागोजी गांडे मुलगी ३८

वरील प्रमाणे मयताच्या वारस असून इतर कुणाचे कोणतेही वारस जाणीत नसी मयताचे नांव कमी करून वरील वारसांची नांवे दाखल केली असे

पर्जी अर्ज ~~अर्जदार~~ ~~अर्जदार~~ जबाब, पंचनामा वारस रजिस्टर व सत्य प्रतिज्ञा पत्रा वरून नोंद

सही
ग्रा. अंबरनाथ

मंडळ अधिकारी—वडवली
ता. अंबरनाथ, जि. ठाणे
२३/३/२०१०

उहन - ४	
१०८९	२०१६
१९	३२

सही

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-२
जि. ठाणे
Dist-Thane

9/8/19

पुढती उतारा
2/8/19

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकारी अभिलेख आणि नोंदवही (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम १०]

गाव : एरंजाड तालुका : अंबरनाथ जिल्हा : ठाणे

अहवाल अनुक्रमांक	संपादन करणाऱ्या अधिकाऱ्याचा शेरा	परिणाम आलेले मुद्दाम व उपविभाग क्रमांक	कार्यवाही अधिकाऱ्याची आज्ञा किंवा शेरा
१२५२	दिनांक १२/१०/२०१२ रोजी मोजणी रजि. नं. ३२/४ चे हद्दकायमचे खुणा दाखवत केलेला वाद मौजे एरंजाड जमीन १) तुकाराम कृष्णा सुस्ते २) लक्ष्मीबाई कृष्णा सुस्ते ३) नारायणी कृष्णा सुस्ते ४) मंजुला नारायणी पाटील ५) शकुंतला रामचंद्र दाऊतो ६) मंदा दत्तात्रय महाडिक ७) रंजना आगेरी नांवे चांचे नावे असून आहेरची जमीन तुकाराम कृष्णा सुस्ते चांचे नावे हेतो आणी १) लक्ष्मीबाई कृष्णा सुस्ते २) नारायणी कृष्णा सुस्ते ३) मंजुला नारायणी पाटील ४) शकुंतला रामचंद्र दाऊतो ५) मंदा दत्तात्रय महाडिक ६) रंजना आगेरी नांवे जमीन रजिस्टर हद्दकायम पत्र करून दिल्याबद्दल त्यांची नावे कमी करून तुकाराम कृष्णा सुस्ते चांचे नावे दाखल केली आहे रा.नं. क्षेत्र आर चौ. आकार रुपये ०-१४-२ ०-१२-६ २-३२ तरी सदरे रजिस्टर हद्दकायम पत्र क्रमांक १०२२/२०१२ दिनांक ३१/१२/२०१२ करून दि. १२/१०/२०१२	०-१४-२	कार्यवाही करावी १) बनोसिंग २) लक्ष्मण ३) [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] २०१२/२०१३ २५/१२/२०१२ नोंद मंजूर [illegible] २६/१२/२०१२

Pingale
सजा, आवीशा०
